**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक**
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel: (0253) 2539243, 2539263, 2539226
Website: www.muhs.ac.in, E-mail: examadmin@muhs.ac.in

MUHS

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र), पी.एच.डी., डी.एससी.
**कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D. (Forensic Medicine), Ph.D., D.Sc.
**Registrar**

जा.क्र. मआविवि/एक्स-ए/८८५८/२०२१ दिनांक: २९ /१०/२०२१

## परिपत्रक क्र. ६० /२०२१

विषय: संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांच्या हिवाळी-२०२१ सुट्टयांबाबत (Winter Vacation)...

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांना कोव्हिड-१९ महामारीच्या अनुषंगाने सन २०२१-२२ मध्ये जाहीर करण्यात येणाऱ्या हिवाळी सुट्टया जाहिर करण्यात आलेल्या नाहीत.

त्यासंदर्भात मला प्राप्त आदेशान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांना कळविण्यात येत की, ३० दिवस हिवाळी सुट्टया ह्या अध्यापकांना अनुज्ञेय असतात. त्यास अनुसरुन कोव्हिड-१९ महामारीच्या अनुषंगाने, स्थानिक स्तरावरील परिस्थितीला अनुसरुन, महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांनी हिवाळी-२०२१ सुट्टयांबाबत महाविद्यालय स्तरावर निर्णय घेऊन तसे विद्यापीठाला अवगत करावे. कोव्हिड महामारीची तिसरी लाट आल्यास, महाविद्यालय प्रशासनाने हिवाळी सुट्टीवर गेलेल्या अध्यापकांना, महाविद्यालय प्रशासनाने रुग्णसेवेसाठी उपस्थित राहण्याचा आदेश बजावल्यास, २४ तासात मुख्यालयात कर्तव्यावर उपस्थित राहण्याच्या अटीवर हिवाळी सुट्टी मंजुर करावी. तसेच, हिवाळी सुट्टीच्या कालावधीतील अध्यापकांचे वास्तव्याचे ठिकाण व संपर्क क्रमांक याची यादी महाविद्यालय प्रशासनाने तयार करावी.

- हिवाळी सुट्टी (पहिला अर्ध) दिनांक २५/१०/२०२१ ते दिनांक ०८/११/२०२१
- हिवाळी सुट्टी (दुसरा अर्ध) दिनांक ०९/११/२०२१ ते दिनांक २३/११/२०२१

सुट्टयांच्या कालावधीत महाविद्यालयीन / रुग्णालयीन कामकाजाच्या अनुषंगाने एकूण अध्यापक वर्गापैकी ५० टक्के अध्यापक वर्ग उपस्थित असणे आवश्यक आहे. तसेच, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील अधिष्ठाता / प्राचार्य यांनी विद्यापीठ लेखी परीक्षा, मुल्यांकन कार्यक्रम व इतर परीक्षा कालावधीत महाविद्यालयात पुरेसा अध्यापक वर्ग महाविद्यालयात उपस्थित राहतील त्याप्रमाणे नियोजन करावे.

विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांचे अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व शिक्षकवृंद यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(डॉ. कालिदास द. चव्हाण)
कुलसचिव

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
मआविवि

प्रत : अधिष्ठाता / प्राचार्य,
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / परिसंस्था
मआविवि, नाशिक